जा.क्र./पोउआ/वाह/३३७९/२०२०

**प्रेसनोट** दिनांक - ११/११/२०२०

मुंबई बेंगलोर हायवेचे ताथवडे अंडरपास ते ताथवडेगाव चौक (पल्स हॉस्पीटल ताथवडे) या दरम्यान ११८० मीटर लांबीची स्ट्रॉंग वॉटर पाईप लाईन टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करुन मी आनंद भोईटे, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, दि.११/११/२०२० पासुन सदर रस्त्यावरील स्ट्रॉंग वॉटर पाइप लाईन टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत खालील प्रमाणे तात्पुरते बदल करण्यात येत आहेत.

## <u>हिंजवडी वाहतुक विभाग अंतर्गत</u>

मुंबई बेंगलोर हायवेचे ताथवडे अंडरपास ते ताथवडेगाव चौकाकडे (पल्स हॉस्पीटल ताथवडे) जाण्यारा सर्व प्रकारचे वाहनांस प्रवेश बंद करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- १.पुनावळे अंडरपास मार्गे पुनावळे बीआरटी रोड येथुन वाहन चालक इच्छित स्थळी जातील.

२.भुमकर चौक-डांगे चौक मार्गे ताथवडे गाव येथुन वाहन चालक इच्छित स्थळी जातील.

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त,
परि.२ अति.कार्य
वाहतुक शाखा, पि.चि.शहर

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक हिंजवडी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

४) कार्यकारी अभियंता, ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner

# BRIS चौक (पल्स हॉस्पिटल) ते ताथवडे सबवे या रस्त्याचे काम चालू असल्यामुळे वाहतुकीत बदल




Scanned with CamScanner